दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ६४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.४ जून २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## भाऊच्या धक्क्यावरील प्रवेशद्वाराला पोर्ट ट्रस्टचे टाळे ; प्रवाशांची गैरसोय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील जलवाहतुकीचा कणा मानल्या जाणाऱ्या भाऊच्या धक्क्यावरील मुख्य प्रवेशद्वार बंद करण्याचा निर्णय मुंबई पोर्ट ट्रस्टने घेतला आहे. त्यानुसार, गुरुवारी या प्रवेशद्वाराला टाळे लावण्यात आले असून, बेस्ट बस, टॅक्सीसह खासगी वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. त्यामुळे अलिबाग आणि 'जेएनपीटी'ला ये-जा करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होऊ लागली आहे. यापूर्वीही भाऊच्या धक्क्यावरील तिकीट काऊंटरनजीक बेस्ट बस वा खासगी वाहने उभी राहायची. आता मात्र, त्यांना मुख्य प्रवेशद्वारातून आत सोडले जाणार नाही. त्यामुळे प्रवाशांना चालत हे अंतर पार करावे लागणार आहे. तर, केंद्र सरकार जलवाहतुकीस प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करत असताना सरकारी अधिकाऱ्यांच्या अशा आडमुठ्या धोरणांमुळे फलनिष्पत्ती होत नसल्याची टीका जलवाहतूकदारांकडून केली जात आहे.

# पनवेलची ओळख आगामी काळात तिसरी मुंबई म्हणून होईल : देवेंद्र फडणवीस

## पनवेल महानगरपालिकेच्या स्वराज्य प्रशासकीय इमारत भूमीपूजन तसेच विविध विकास कामांचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल शहराचा विकास चोहोबाजूने होत आहे. त्यासाठी योग्य नियोजनाची आवश्यकता आहे. या नगरीचे नियोजन योग्य रितीने केल्यास मुंबई, नवी मुंबई प्रमाणे पनवेल हे शहर आगामी काळात तिसरी मुंबई म्हणून ओळखले जाईल असा विश्वास विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आज पनवेल शहरातील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून स्वराज्य प्रशासकीय इमारत भूमीपूजन तसेच विविध विकास कामांचे लोकार्पण त्याचप्रमाणे विविध विकास कामांच्या भूमीपूजनाप्रसंगी व्यक्त केला.**



यावेळी व्यासपिठावर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री कु.आदिती तटकरे, समारंभा अध्यक्षा महापौर डॉ.कविता चौतमोल, खा.श्रीरंग बारणे, खा.सुनील तटकरे, आ.प्रशांत ठाकूर, आ.बाळाराम पाटील, आ.निरंजन डावखरे, आ.रविशेठ पाटील, आ.रवींद्र चव्हाण, मा.मंत्री राम शिंदे, मा.खा.रामशेठ ठाकूर, सभागृहनेते परेश ठाकूर, उपमहापौर सिताताई पाटील, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, आयुक्त गणेश देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आज विविध विकास कामांचे भूमीपूजन व लोकार्पण करण्यात आले. या भरगच्च कार्यक्रमात जेवढ्या उठ्याबश्या काढाव्या लागल्या तेवढ्या शाळेत सुद्धा काढाव्या लागल्या नव्हत्या. पनवेल महानगरपालिका ही तरुण महानगरपालिका आहे. हिची स्थापना २०१६ साली झाली. आजही अनेक प्रश्न प्रलंबित असून सिडको व एमएमआरडीए या दोन संस्था लगत आहेत. शहरी भागाचा विकास होत असताना ग्रामीण भागाकडे सुद्धा लक्ष देणे गरजेचे आहे. केंद्र शासनाच्या विविध योजना येथे राबविण्यात येत आहेत. नागरिकांच्या प्रश्नासाठी सर्वांनी एकत्र येवून काम केल्यास पनवेलचा विकास मोठ्या प्रमाणात होईल. मोठमोठे उद्योजक या ठिकाणी व्यवसायानिमित्त गुंतवणूक करीत आहेत. आगामी काळात होत असलेले विमानतळ तसेच न्हावा-शेवा सिलींक यामुळे ही नगरी मुंबईला जोडली जाणार आहे. तरी योग्य त्या सोयी सुविधा व प्रश्न सर्वांनी एकत्रित येवून सोडवू असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले आहे.

तर यावेळी बोलताना पालकमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, या नगरीचा जीएसटीचा विषय, पिण्याच्या पाण्याचा विषय, तसेच इतर महत्वाचे विषय महाविकास आघाडीच्या माध्यमातून सोडविले जात आहेत. यासाठी आम्ही सर्वच पाठपुरावा करीत आहोत. आगामी काळात पांडवकडा हा धबधबा चांगले पर्यटनस्थळ होण्याच्या दृष्टीने राज्य शासन सिडको व वनखात्याच्या माध्यमातून काम करीत आहे. त्याचप्रमाणे आगामी काळात या शहरा लगत सह्याद्री अतिथीगृहाच्या धर्तीचे असे देशपरदेशातून येणाऱ्या महत्वाच्या व्यक्तींसाठी या भागात गेस्ट हाऊस उभारण्याचा संकल्प महाविकास आघाडीचा आहे. याला सर्वांची साथ असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

तर खा.सुनील तटकरे यांनी सांगितले की, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस हे आमचे चांगले मित्र असून ते सत्तेत असताना त्यांचे काम पाहिले आहे. तसेच विरोधी पक्षात असतानाही त्यांची आक्रमकता पाहिली आहे. मुख्यमंत्री असले तरी त्यांचे आक्रमकता पाहून ते विरोधी पक्षाच्या भूमिकेतच दिसायचे, असा टोला त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना लगावला. तर खा.श्रीरंग बारणे यांनी सुद्धा पनवेल शहराच्या विकासासाठी जे प्रलंबित प्रश्न असतील त्या संदर्भात शिवसेना नेते व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलणार असल्याचे त्यांनी सांगून पनवेलकरांचा पाण्याचा प्रश्न तसेच सिडकोचा प्रश्न महाविकास आघाडी मार्गी लावेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

> पनवेलकर खुप हुशार आहेत हे मी जवळून बघितले आहे. आजच्या कार्यक्रमात सुद्धा आ.बाळाराम पाटील यांचा सत्कार सभागृह नेते परेश ठाकूर यांचा सत्कार केला. तर आ.प्रशांत ठाकूर यांचा सत्कार विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते केला. दिवसा विरोधात असले तरी संध्याकाळी दोन शेठ एकत्र असतात हे सर्वांना माहित आहे, त्यामुळे मी त्यांची नावे सांगत नाही, यावेळी सभागृहात एकच हशा उडाला.
>
> **: खा.सुनील तटकरे**

## गरिबीतून मोठे झालेले लोकनेते रामशेठ ठाकूर गरिबांना विसरले नाहीत : आ.गणेश नाईक

**दै.रायगड नगरी । पनवेल**




कोणत्याही क्षेत्रात ज्येष्ठांच्या अनूभवी मार्गदर्शनाशिवाय यशस्वी वाटचाल करणे शक्य नाही आणि त्यांच्या अनुभवाची शिदोरी समाजाला दिशा देणारी आहे. त्यामुळे ज्येष्ठांचा सन्मान व त्यांच्याप्रती आदर व्यक्त करत गुरुवारी (दि.०२) सायंकाळी न्हावा खाडी येथे उत्तर रायगड जिल्हा भाजप व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा हृद्य सत्कार करण्यात आला. निमित्त होते ते समाजसेवेचा अथांग सागर, दानशूर व्यक्तिमत्व आणि सर्वसामान्यांचे आधारवड असेलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७१ वा वाढदिवस. भव्य शामियानात झालेल्या या सोहळ्याने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समाजाला ऊर्जा देणारा ठरला.

आणि या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभलेले माजी मंत्री विद्यमान आमदार लोकनेते गणेश नाईक, माजी मंत्री विद्यमान आमदार रवीशेठ पाटील, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार महेश बालदी, लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव या सोहळ्यात केला. गरिबीतून मोठे झालेले लोकनेते रामशेठ ठाकूर कधीच गरिबांना विसरले नाहीत, त्याचबरोबरीने समाजसेवेचा अखंड यज्ञ सुरूच असल्याचे गौरवोद्गार त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिष्टचिंतन करताना मनोभावे व्यक्त केले. यावेळी या उपस्थित मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांचे भव्य पुष्पहार देऊन अभिष्टचिंतन केले. यावेळी व्यासपीठावर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सभागृहनेते परेश ठाकूर, स्व. दि. बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, सामाजिक कार्यकर्ते दशरथ भगत, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक इतिहासात ज्या थोर व महनीय व्यक्तींनी आपल्या कर्तुत्वाने नवी दिशा दिली. त्या व्यक्तीमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव फार महत्वाचे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रात स्वकर्तृत्वाने त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले. पण ते कधी सर्वसामान्य माणसाला विसरले नाहीत, आजही ते तळागाळात मदत करत असतात म्हणून त्यांची दानशूर कीर्ती देशभर आहे. आणि त्यांचा माणसावर जास्त विश्वास आहे, त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त न्हावा खाडी येथे ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अभिष्टचिंतन सोहळा, आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून उलवा नोडसाठी देण्यात आलेल्या रुग्णवाहिका व शववाहिकेचे लोकार्पण, तसेच महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत व नंदेश उमप निर्मित लोककलांतून महाराष्ट्राच्या वैभवशाली संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या 'मी मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा महत्वपूर्ण घटक आहे. ज्येष्ठ नागरिक हे कुटुंब आणि समाजाला नेहमीच मार्गदर्शक आणि हितचिंतक राहिलेले असतात. वृद्धपण हे देवाने माणसाला बहाल केलेले दुसरे बालपण असते. मनुष्याचा वृद्धापकाळ हा नेहमी समाधानी आणि आनंदपूर्ण असायला हवा. आणि त्यासाठी सामाजिक आणि कौटुंबिक सहाय्य महत्वाचा दुवा ठरतो. त्यामुळे सामाजिक भावना लक्षात घेत ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान या सोहळ्यात होत असताना कुटुंबवत्सल वातावरण अधोरेखित होत होता. काही ठिकाणी ज्येष्ठ अडसर म्हणून समजले जातात पण लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच ज्येष्ठांचा सन्मान केला आहे. किंबुहना रायगड जिल्ह्यात सर्वाधिक ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्याचे समारंभ त्यांनी केले आहेत. आज पर्यंत लाखाहून अधिक ज्येष्ठ नागरिकांचे त्यांनी सत्कार करून ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर सन्मान केला आहे. त्या अनुषंगाने हि परंपरा कायम ठेवत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

गरिबांच्या वेदना लोकनेते रामशेठ ठाकूर यांना माहित आहेत, त्यामुळे ते गरिबाला कधीही विसरले नाहीत, असे गौरवोदगार माजी मंत्री विद्यमान आमदार लोकनेते गणेश नाईक यांनी

.../२

## लाखोची फसवणूक करणाऱ्या पाहिजे आरोपीस गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल कडून अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सहार पोलीस स्टेशन, मुंबई कडील फसवणुकीच्या गंभीर गुन्ह्यातील पाहीजे आरोपी गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल, नवी मुंबई कडुन जेरबंद करण्यात आली आहे.

अंधेरी मुंबई येथील ऑनसाईट इलेक्ट्रो सर्व्हिसेस प्रा.लि. या इलेक्ट्रॉनिक वस्तुंच्या सेवा पुरवणा-या कंपनिमधील सर्वीस को ऑर्डिनेटर नागेश भिकाजी राणे, वय-३६, धंदा- नोकरी, रा. रुम नं. ०६, बी विंग, तानिया हाईट्स, वसई (पु) याने त्याचा साथिदार अभिषेक कुमार सिंग याचे सोबत कंपनीच्या अकाउंटचा अपहार करुन फसवणुक केल्याने सहार पोलीस ठाणे, मुंबई गु.रजि.क्र. २५०/२०२२ भा.दं.वि. कलम ४०८,४०९,३४ प्रमाणे दि. २२/०४/२०२२ रोजी दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी नामे नागेश भिकाजी राणे, वय-३६, धंदा- नोकरी, रा. रुम नं. ०६, बी विंग, तानिया हाईट्स, वसई (पु) हा गेली अनेक दिवस मिळुन येत नव्हता. नमूद आरोपी हा दिवसभरात काही मिनिटेच मोबाईल वापरत असे. आरोपीचे लोकेशन नवी मुंबई परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी येत असल्याने मुंबई पोलिसांनी नमुद आरोपीचा शोध घेण्याबाबत कळविले होते.

सदरच्या गंभीर गुन्ह्यातील पाहीजे आर-ोपीस अटक करणेबाबत मा. पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग, सह. पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) महेश घुर्ये, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे)

.../२

## 3 लाखांच्या ऐवजावर डल्ला मारून नोकर झाला पसार


**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरकाम करण्यासाठी ठेवलेल्या नोकराने तीन लाख सहा हजार रुपयांचे पैसे व मुद्देमालाची चोरी केल्याची घटना उलवे, सेक्टर १७ येथे घडली आहे. या प्रकरणी न्हावा शेवा पोलीस ठाण्यात रियाज मुसा याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उलवे, सेक्टर १७ येथे राहणारे मोहम्मद फाजिल टीपी यांनी घरकाम करण्यासाठी रियाज मुसा (वय ४४ राहणार -केरळ) ठेवले होते. दीड वर्षापासून तो त्यांच्याकडे काम करतो. मोहम्मद व त्याच्या आई-वडिलांना केरळला जायचे असल्याने वडिलांनी रियाजला उलवे येथे येण्यास सांगितले. त्यानंतर मोहम्मद व आई-वडील हे मूळगावी केरळ येथे गेले. जाताना घराची एक चावी वॉचमनला दिली त्यानंतर वडिलांनी रियाजला कॉल केला असता त्याने उलवे येथे आला असल्याचे सांगितले. त्यानंतर चार ते पाच दिवसांनी रियाजचा मोबाईल नंबर बंद लागत असल्याने त्याच्या सोबत संपर्क होऊ शकला नाही. उलवे येथे मोहम्मद व आई वडील आले असता रियाज घरी नव्हता तसेच त्यांना घरात लॅपटॉप मिळून आला नाही व त्याचा मोबाइल बंद असल्याने घरातील वस्तू व पैसे पाहिले असता मोबाईल, लॅपटॉप, अंगठ्या,क्सिस बँकेचे चेकबुक सापडून आले नाही. त्यामुळे रियाजच्या विरोधात तीन लाख सहा हजार रुपयांचा ऐवज चोरी केली असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## आयुक्त, मुख्याधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी करा : ना.एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । मुंबई**



पूरजन्य परिस्थितीच्या तयारीचा आढावा प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन घ्या, तसेच पूरपरिस्थिती हाताळण्याचे नियोजन करताना स्थानिकांचा सहभाग वाढविण्याची सूचना नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. पावसाळ्यातील संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी नालेसफाई, रस्त्यांवरील खड्डे बुजविणे आदी कामे प्राधान्याने करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त, मुख्याधिकाऱ्यांनी स्वतः यात लक्ष घालून ही कामे पूर्ण करावीत. नियंत्रण कक्ष, अग्निशमन दलासह आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश नगरविकासमंत्र्यांनी आज दिले. दरम्यान, पावसाळ्यात आपत्कालिन परिस्थितीला तोंड देण्यासाठी आवश्यक साधनसामुग्री, उपकरणांच्या खरेदीसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही देतानाच जिल्ह्यांनी नियोजन समितीच्या निधीतून अत्यावश्यक खरेदी करण्याच्या सूचना नगरविकासमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिका-नगरपंचायतींनी केलेल्या

.../२

## ...तर राज्यातील पालिका निवडणुका पुढे ढकलणार : राज्य सरकार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून राज्यासह मुंबईतील कोरोना रुग्णांचा आकडा अचानक वाढू लागाला आहे. वाढत्या रुग्णसंख्येमुळे अलर्ट झालेल्या केंद्र सरकारने राज्य सरकारला पत्र पाठवले आहे. राज्यात आजही एक हजाराहून अधिक रुग्णांची नोंद झाल्याने चिंता वाढली आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यात पुढच्या काही महिन्यांमध्ये होणाऱ्या महानगरपालिकांच्या निवडणुकीबाबत अनिश्चिततेचं वातावरण निर्माण झालं आहे. कोरोनाचे रुग्ण आणखी वाढल्यास या निवडणुका पुढे ढकलण्याची विनंती निवडणूक आयोगाकडे करणार असल्याची माहिती राज्याचे मदत आणि पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे.

राज्यातील वाढती कोरोना रुग्णसंख्या आरोग्य यंत्रणेसह राज्य सरकारची चिंता वाढवत आहे. त्यामुळे राज्यात होऊ घातलेल्या महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीवर अनिश्चिततेचं सावट आलं आहे. विजय वडेट्टीवार यांनी सांगितले की, पुढे सांगितले की, पुढचे आठ ते १० दिवस महत्त्वाचे आहेत. त्यावरूनच पुढचा निर्णय घेतला जाईल. या निवडणुकांची घोषणा ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याला अजून अवधी आहे. मात्र काही परिस्थिती ओढवली तर निवडणूक आयोगाला निवडणूक पुढे ढकलण्यासाठी विनंती करावी लागेल. तसेच निवडणुका टाळता येतील का, याबाबतही चाचपणी सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील कोरोना रुग्णसंख्या सातत्याने वाढत आहे. आज राज्यात ११३४ नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. तसेच मुंबईमध्येही गेल्या काही दिवसांपासून ५०० च्या वर कोरोनाचे रुग्ण सापडत आहेत.

# विभागीय माहिती कार्यालयाचे प्रल्हाद अभंग यांना सेवानिवृत्ती निमित्त निरोप

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

कोकण विभागीय माहिती कार्यालयातील गेल्या २९ वर्षापासून यशस्वीपणे सेवा देणारे रोनिओ ऑपरेटर श्री. प्रल्हाद तुळशीराम अभंग हे आज दि . ३१ मे २०२२ मंगळवार रोजी नियतवयोमानानूसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त विभागीय माहिती कार्यालयात छोटेखानी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्नेह, प्रेमपूर्वक निरोप देऊन पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त रोनिओ ऑपरेटर श्री. प्रल्हाद अभंग यांचा यथोचित सत्कार आणि गौरव केला. यावेळी श्री. अभंग यांच्या पत्नी सौ. उषा अभंग, कन्या सौ. कविता पाठारे, मुलगा मयुर आणि सून नम्रता मयुर अभंग तसेच परिवारातील इतर सदस्य, कोकण भवनातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी श्री. अभंग म्हाणाले की, २१ जून १९९३ रोजी विभागीय माहिती कार्यालयाच्या सेवेत रुजू झालो. संपूर्ण सेवाकार्यकाळात मला माझ्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या सहकार्यामुळे माहिती खात्याला चांगल्या प्रकारे सेवा देण्याचा माझ्या परिने प्रयत्न केला आहे. सेवानिवृत्त होत असताना मी माझ्या सेवाकाळात लाभलेल्या सर्व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त करतो, प्रत्येक कार्यात आपण सर्वांनी दिलेले प्रोत्साहन मार्गदर्शन व अनमोल अशी केलेली मदत या बद्दल मी आपला सर्वांचा ऋणी राहीन. आपण माझ्या पुढील आयुष्यासाठी ज्या शुभेच्छा दिल्या. त्याबद्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर, मित्रवर्ग, सहकारी अधिकारी /कर्मचारी तसेच कुटुंबातील सदस्यांनी श्री. अभंग यांच्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचालन माहिती सहायक प्रविण डोंगरदिवे यांनी केले. श्री. प्रल्हाद अभंग यांना सेवानिवृत्ती निमित्त कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी माहिती कार्यालयाकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

मा.सोनावणे साहेब कोर्ट

**ॲड.शशिकांत काळू म्हात्रे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.७३४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/७/२०२२

१) श्रीमती.प्रमिला हरेश्वर पाटील
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.निकिता हरेश्वर पाटील (लग्नापूर्वीचे नाव)
सौ.निकिता आशुतोष घरत (लग्नानंतरचे नाव)
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
३) कु.अंकिता हरेश्वर पाटील
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
घर नं.२२ बी, मंडळ आळी नागाव, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ३ यांचे वडील कै. हरेश्वर जगन्नाथ पाटील उर्फ हरिश्चंद्र जगन्नाथ पाटील हे दि.२४/०७/२०११ रोजी मौजे : नागाव, मंडळ आळी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची आई कै.बाबीबाई जगन्नाथ पाटील ह्या दि.१४/१२/२०१० रोजी मौजे : नागाव मांडळ आळी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.हरेश्वर जगन्नाथ पाटील उर्फ हरिश्चंद्र जगन्नाथ पाटील यांचे आईच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| म्हातवली | ६ | २८-३ (१) +१+२/B | १-४-८ | ०-४५-१ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा कै.हरेश्वर जगन्नाथ पाटील उर्फ हरिश्चंद्र जगन्नाथ पाटील यांच्या आईच्या नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.हरेश्वर जगन्नाथ पाटील उर्फ हरिश्चंद्र जगन्नाथ पाटील यांचे वारसदार या नात्याने कै.हरेश्वर जगन्नाथ पाटील उर्फ हरिश्चंद्र जगनाथ पाटील यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.हरेश्वर जगन्नाथ पाटील उर्फ हरिश्चंद्र जगन्नाथ पाटील यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्यबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.३/६/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# एसटीचा वर्धापन दिन उरण बस आगारात उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण आगारात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा ७४ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी उरण तालुक्यातील मान्यवर रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील सर व महादेव घरत- अध्यक्ष द्रोणागिरी स्पोर्ट्स क्लब यांच्या हस्ते आगारातील लालपरी बस क्र. MH14 BT 1416 चे पुजन करण्यात आले व उरण आगाराने २०२१ या वर्षात इंधन बचत मोहिमेत मुंबई विभागात एकमेव विजेतेपद घेतले त्याबद्दल आगारातील चालकांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

व माहे जुन-२०२२ मध्ये आगारातील जेष्ठ चालक बि.बि.माने हे सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील तक्ता क्र.१ व २ प्रमाणे वर्णनित मिळकत :-

**तक्ता क्र.१**
**मिळकतीचे वर्णन**

| अनु क्र. | सी.टी.एस. क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | ८३१/५ अ | ११५.१० | पनवेल उपहार गृह एम.जी.रोड, टपालनाका, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ |

**तक्ता क्र.१**
**मिळकतीच्या चर्तुःसिमा**

| अनु | दिशा | चर्तुःसिमा |
|---|---|---|
| १ | पूर्वेस | मुरबाडकर बंधू यांचे दुकान |
| २ | पश्चिमेस | सी.टी.एस.क्र.८३१/५ ब मधील कोमल ज्वेलर्स यांचे दुकान |
| ३ | उत्तरेस | सर्विस लेन व त्यानंतर के.आर.जोशी ॲन्ड सन्स |
| ४ | दक्षिणेस | एम.जी.रोड |

आमचे पक्षकार श्री.भावेश लक्ष्मीदास सुचक हे वरील उल्लेखित मिळकतीसाठी इतर वारसासमवेत वारसदार असून सदरच्या मिळकतीमध्ये त्यांचा रितसर पणे अविभाज्य हक्क व अधिकार अबाधित आहे. सदरची मिळकत ही भाडे कराराने पनवेल उपहारगृह या हॉटेल व्यवसायासाठी दिली आहे. सदरच्या मिळकती संबंधी व्यवहारासाठी जोरदार तयारी चालू असल्याची माहिती असून अशा व्यवहाराला आमच्या पक्षकाराची संमती नाही. तरी सदरच्या मिळकती बाबत जनतेस सुचित करण्यात येते की, कोणीही आमच्या पक्षकाराच्या लेखी संमती शिवाय व्यवहार करू नये तसे केल्यास होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेशीर परिणामांस जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.०४/०६/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**व्ही ॲन्ड एस लिगल असोशिएट**
**ॲड.शंकर बी. पानपट्टे**
**कार्यालय : सत्य साई प्लाझा, शॉप नं.५६, सेक्टर ११, नवीन पनवेल, ता.पनवेल जि.रायगड ४१०२०६, मो.८६९१९४९१३८**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## गरिबीतून मोठे झालेले लोकनेते रामशेठ ठाकूर गरिबांना विसरले नाहीत : आ.गणेश नाईक

यावेळी काढले. १९९६-९७ साली आम्हा दोघांचा परिचय झाला. संजीव नाईक यांचे ते शिक्षक होते, त्यामुळे रामशेठ आणि संजीव यांच्यात गुरु शिष्याचे नाते आहे. रामशेठ यांना अनेक आमिषे आली पण ते तत्व पाळणारे आहेत, त्यामुळे ते कधीही त्या आमिषांना बळी पडले नाहीत. रामशेठ यांचे पुत्र आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर विनम्र व सजग असे आहेत, ते सुद्धा त्यांच्या पाऊलांवर पाऊल ठेवून समाजाच्या उत्कर्षाचे काम करीत आहेत. कोणतेही कार्य करताना ते जात धर्म पंथ बघत नाहीत म्हणूनच लोकांच्या मनात त्यांच्याविषयी आदराचे स्थान आहे, असेही त्यांनी आवर्जून अधोरेखित केले. तसेच रामशेठ यांचा सन्मान म्हणजेच समाजाचा सन्मान आहे, असेही त्यांनी कौतुकोद्गार काढले. जुन्या आठवणींचा वेध घेताना त्यांनी सांगितले कि, मी शिवसेनेमध्ये असताना दि. बा. पाटील साहेब शेकापत होते आणि त्यावेळी रायगडमध्ये शिवसेना रुजावी हि शेकापची धारणा नव्हती त्यामुळे दि. बा. पाटील आणि माझ्यामध्ये थोडेबहुत मतभेद झाले होते मात्र आता नवी मुंबई विमानतळाला दिबांचे नाव देताना अनेकदा मी नसल्याचा उल्लेख होतो संजीव नाईक या लढ्यात आहे याचा अर्थ मी सुद्धा या लढ्यात आहे, ज्यावेळी रस्त्यावर उतरण्याची वेळ येईल त्यावेळी या लढ्यात ताकदीनिशी उतरीन, असे गणेश नाईक यांनी जाहीर केले.

यावेळी आमदार महेश बालदी यांनी म्हंटले कि, लोकनेते यांचा वाढदिवस स्फूर्ती व ऊर्जा देणारा दिवस आणि त्याचे औचित्य साधून या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. लोकनेते रामशेठ ठाकूर या गावात जन्मले. मी या गावात जन्मलो, खेळलो वावरलो त्या गावात जे जे मला चांगले करता आले पाहिजे हि भावना ठेवून ते काम करीत आहेत. या परिसरात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रामबाग उभारली आहे. महाराष्ट्रात अनेक नेते झाले पण आपल्या गावाठिकाणी असे नंदनवन फुलवले नसेल. त्यामुळे हा परिसर आवर्जून पहा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या सन्मानाला उत्तर देताना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, आजच्या अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, रुग्णवाहिकेचे लोकार्पण अशा समारंभासाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे मी आभार मानतो. हा कार्यक्रम माझ्या जन्मगावीच होत असल्याचा मला जास्त आनंद आहे. नवी मुंबईचे आमदार गणेश नाईक यांचे चिरंजीव संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, परेश ठाकूर ही पिढी आज सक्षमपणे विकासाची कामे करीत आहे, हे बघून समाधान वाटते. मी लहान असतानाचे न्हावाखाडी आणि आता विकास झालेले न्हावाखाडी यात खूप फरक आहे आणि हा फरक मला करता आला, याबद्दल कृतार्थ झाल्यासारखे वाटत आहे. या सोहळ्यात पंचक्रोशीच्यावतीने न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्वर म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, चिंतामण भोईर, विजय घरत, सागर ठाकूर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिष्टचिंतन केले. या सोहळ्यास सामाजिक, शैक्षणिक, कला, राजकीय, कामगार, क्रीडा आदी विविध क्षेत्रातील मान्यवर आणि हजारोंच्या संख्येने नागरिक, हितचिंतक उपस्थित होते.

## लाखोची फसवणूक करणाऱ्या पाहिजे आरोपीस गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल कडून अटक

सुरेश मेंगडे यांनी आदेशीत केले होते. सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपीचा शोध घेण्याच्या अनुशंगाने मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) विनायक वत्स यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे, गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल नवी मुंबई यांचे नेतृत्वाखाली गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल चे पथकाने नमुद आरोपीची माहिती काढत असताना नमुद आरोपी हा तळोजा, दिपक फर्टिलायझर कंपनी परिसरामध्ये असलेबाबत माहीती मिळाली होती. त्या अनुशंगाने तांत्रिक तपास करुन व गोपनिय माहीती मिळवुन नमुद आरोपीस सापळा लावुन ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीची वैद्यकिय तपासणी करुन पुढिल तपासकामी त्यास सहार पोलीस ठाणे, मुंबई यांचे ताब्यात देण्यात आले आहे

सदरची उल्लेखनिय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांच्या नेतृत्वाखाली स.पो.नि. संदिप गायकवाड, प्रविण फडतरे, पोलिस उप निरीक्षक वैभव रोंगे, मानसिंग पाटील, सुदाम पाटील, पो.हवा. अनिल पाटील, मधुकर गडगे प्रशांत काटकर, तुकाराम सुर्यवंशी, रणजित पाटील, सचिन पवार, जगदिश तांडेल, राजेश बैकर, पो.ना. दिपक डोंगरे, इंद्रजित कानु, रुपेश पाटील, निलेश पाटील, सचिन म्हात्रे, राहुल पवार, अजिनाथ फुंदे, प्रफुल्ल मोरे, नंदकुमार ढगे, अभिजित मे-या, पो.शि. संजय पाटील, प्रविण भोपी, विक्रांत माळी यांनी केली आहे.

## आयुक्त, मुख्याधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी करा : ना.एकनाथ शिंदे

तयारीचा आज नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी आढावा घेतला. दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीस नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती सोनिया सेठी, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त, नगरपरिषद मुख्याधिकारी, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यापूर्वीच मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेऊन निर्देश दिले असून शहरांमधील नालेसफाई, रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, नियंत्रण कक्ष आणि अग्निशमन दलाची सज्जता, धोकादायक इमारती, वृक्षछाटणी आदी विषयांवर महानगरपालिका, नगरपालिकांनी तातडीने कार्यवाही करावी, त्यासाठी विविध विभागांशी समन्वय राखण्याच्या सूचना नगरविकासमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिल्या.

शहरांमधील नाल्यांची १०० टक्के सफाई होईल याकडे विशेष लक्ष पुरवून नालासफाई झालेल्या भागातील गाळ, कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावण्याच्या सूचना नगरविकासमंत्र्यांनी यावेळी दिल्या. शहरातील पाणी साचणारी ठिकाणे शोधून आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देतानाच रस्त्यांवरील खड्डे पावसाळ्यापूर्वी भरण्याचे निर्देशही मंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले. धोकादायक इमारतींमधील रहिवाशांच्या निवाऱ्याची व्यवस्था करण्यासाठी पूर्वतयारी करुन ठेवण्याबरोबरच शहरातील मोठे होर्डिंग्ज पडून दुर्घटना घडणार नाही त्यासाठी होर्डिंग्जची तपासणी करण्याच्या सूचनाही नगरविकासमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या.

पावसाळ्याच्या काळात संकटसमयी शहरांमधील रहिवाशांना तात्काळ मदत पोहोचावी यासाठी सर्व महानगरपालिका, नगरपालिकांनी आपले नियंत्रण कक्ष सज्ज ठेवावेत. जनतेला माहिती देण्यासाठी अलर्ट प्रणाली कार्यन्वित ठेवण्याबरोबरच नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमांक जनतेपर्यंत प्रसारमाध्यमांद्वारे पोहोचविण्याच्या सूचनाही नगरविकासमंत्र्यांनी दिल्या. नियंत्रण कक्षाची सज्जता तपासण्यासाठी मॉकड्रिल घेण्याबरोबरच नियंत्रण कक्षाला आयुक्तांनी अचानक भेटी देऊन पाहणी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. साथीचे आजार उद्भवणार नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करा, त्याशिवाय औषधांचा पुरेसा साठा करण्यासह आपत्कालिन स्थितीमध्ये रुग्णालये, रुग्णवाहिका, अग्निशमन दलाला सज्ज करुन ठेवण्याचे निर्देशही यावेळी नगरविकासमंत्र्यांनी दिले.

पावसाळ्यात धरणांचे दरवाजे उघडताना खालच्या गावांची स्थिती पाहून संबंधितांशी संपर्क-समन्वय करुनच निर्णय घ्यावा, दरवाजे उघडल्यानंतर खालच्या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घेतानाच जलसंपदा विभागाच्या सर्व अभियंत्यांनी या काळात अधिक सतर्क राहावे. नदीकाठच्या गावांशी संपर्क तुटल्यास त्या गावांमधील रहिवाशांना अन्नधान्ये, औषधे पुरविण्यासाठी व्यवस्था करणे आवश्यक आहे. धबधब्यासारख्या पर्यटन प्रवेश बंदीच्या ठिकाणावर लक्ष ठेवून कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी सतर्क राहावे लागणार आहे. भूस्खलन किंवा दरड कोसळणाऱ्या ठिकाणी अधिकची दक्षता घेण्याबरोबरच अग्निशमन दलाने सज्ज राहण्याच्या सूचनाही नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

# मुरुड तालुका कृषी विभागातर्फे सर्वे येथे बीज प्रक्रिया ड्रम द्वारे प्रात्यक्षिक

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शेतकऱ्यांना शेतात पेरण्यासाठी उत्तम प्रकारे भात बियाणे मिळावे. यासाठी मुरुड तालुका कृषी विभागातर्फे तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली काशिद ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे येथे भात बियाणे बीज प्रक्रिया ड्रम द्वारे प्रात्यक्षिक घेण्यात आले.याचा शेतकरी बांधवांनी लाभ घेतला.

भात बियाणाला बुरशीनाशक औषधे व उगवण क्षमता वाढविणारी खते योग्य प्रकारे व योग्य प्रमाणात लावण्यासाठी बीज प्रक्रिया ड्रम चा वापर फायदेशीर कसा होतो.ह्या बाबत तालुका कृषी विभागाचे कृषी सहायक आदिराज चौलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांच्या मदतीने बीज प्रक्रियेसाठी सीड ड्रम तयार करून घेण्यात आला. सतीश धारवे व कृषीमित्र सुशील खोपकर यांनी माहितीपर मार्गदर्शन केले तर भास्कर खोपकर यांनी बीज प्रक्रिया ड्रम तयार करण्यासाठी सहकार्य केले.

अशा प्रकारचे सीड ड्रम प्रत्येक गावात शेतकऱ्यांनी तयार करून घेतले तर गावातील शंभर टक्के क्षेत्रावर बीज प्रक्रिया करणे सहज शक्य होईल.असा विश्वास तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांनी व्यक्त केला आहे.

# त्या चिमुकलीचे अनोखे संवेदनशील धाडस

## शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी घेतली दखल



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अनन्या अनिल पवार या अवघ्या अकरा वर्षाच्या चिमुकलीने अनोखे संवेदनशील धाडस करून माणुसकी जोपासली आहे. या चिमुकलीने नुकतेच आपले लांबसडक सुंदर केस कॅन्सरग्रस्तांना दान केले आहेत. रायगड जिल्हा परिषद मुख्याधिकारी डॉ. किरण पाटील व मान्यवरांनी अनन्याचा सत्कार करून कौतुक केले.

अनन्या राजीप शाळा उसर्ली खुर्द, तालुका पनवेल येथे इयत्ता सहावीत शिकत आहे. कॅन्सरग्रस्तांसाठी काम करणाऱ्या मदत या संस्थेकडे अनन्याने आपले तब्बल ३५ ते ४० सेंटीमीटर लांब केस बुधवारी (ता.१८) दान केले. अनन्याला आपल्या लांब केसांचा उपयोग कॅंन्सरग्रस्त रुग्णांना होईल ही प्रेरणा महिला दिनानिमित्त शिक्षिका चित्ररेखा जाधव यांच्याकडून मिळाली. तसेच शाळेत राबविले जाणारे अवयवदान चळवळ व प्रबोधनात्मक कार्यक्रम, शाळेचे मूल्यशिक्षण उपक्रम यातून अनन्याला याबाबत प्रोत्साहन मिळत होते. त्यातून तिने केसदान करण्याचा निर्णय घेतला व तो सत्यात उतरविला. यासाठी तिला वडिल अनिल पवार, भाऊ वेदांत व ताई श्रद्धा यांचे पाठबळ व मदत मिळाली. सगळ्या प्रक्रियेत केस दान करण्याची ऑनलाइन प्रक्रिया, प्रत्यक्ष कापणे व ते पाठवणे यासाठी बहीण श्रद्धा हिने पुढाकार घेतला. हे केस मदत या संस्थेला कॅन्सरग्रस्तांना विग बनविण्यासाठी दान करण्यात आले.

अनन्याच्या सत्कार प्रसंगी मुख्याधिकारी डॉ. किरण पाटील, सहाय्यक शिक्षण उपसंचालक शेषराव बढे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन निलेश घुले, प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, व कल्पना काकडे, जिल्हा समन्वयक संदीप वारगे, केंद्रप्रमुख निंबाजी गीते, मुख्याध्यापिका प्रगती म्हात्रे, तिच्या मार्गदर्शक वर्गशिक्षिका चित्ररेखा जाधव, शिक्षिका वैशाली अंबुर्ले, आई विद्या पवार, सुरेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

एवढ्या लहान वयात एवढी समज, संवेदनशीलता दाखवून धाडस करणे खूप कौतुकास्पद आहे. आपल्या छोट्या कृतीतुन समाजाची सेवा करणे ही एक प्रकारे देश-सेवाच आहे. ही सेवावृत्ती जपायला हवी तुझी ही संवेदनशीलता जप आणि क्लेक्टर होण्याचे तुझे स्वप्न पूर्ण कर अशा शुभेच्छा अनन्याला मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिल्या.

अनन्याच्या या उपक्रमाची दखल शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी घेऊन त्या संदर्भात ट्विट देखील केले आहे. शिवाय रायगड दौऱ्यावर आल्यानंतर अनन्याची भेट घेऊन तिचा सत्कार व कौतुक करण्याचा मानस असल्याचे सांगितले.

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
महाराष्ट्र शासन
Email : mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No.(02145) 222167

**निविदा सूचना क्रमांक १८ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील कापडे पितळवाडी बोरघर कामाचे रस्ता प्रजिमा-१०१ कि.मी. १६/१०० मध्ये आरसीसी पुलाचे बांधकाम करणे. (नाबार्ड-२७) | ५६८६९६७ | ५७००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |
| २ | रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील रा.म. मार्ग ६६ ते धामणदेवी कोंढवी महाळगुर रस्ता प्रजिमा-९९ कि.मी. ०/० ते ३/५०० मध्ये मोठ्या पुलाचे बांधकाम करणे. (नाबार्ड-२७) | ८२२२०४८ | ८३००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |
| ३ | रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यतील पैठण कोतवाल बुद्रुक ते काळकाई माता मंदिर धनगरवाडी रस्ता कि.मी.०/० ते ५/०० पुलासहीत पोच मार्गाचे बांधकाम करणे. (नाबार्ड-२७) | ७९६२३६२ | ७०००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |
| ४ | रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील पळचिळ गोलदरा खडकवणे ग्रामा-३ रस्ता येथे कि.मी. १/६०० मध्ये पुलाचे बांधकाम करो. (नाबार्ड-२७) | ८२३१२४५ | ८३००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |
| ५ | रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील परसुले क्षेत्रपाल रस्ता इजिमा-१६२ वरील कि.मी.१/२०० मधील पुलाचे बांधकाम करणे. व जोड रस्त्याचे बांधकाम करणे. (नाबार्ड-२७) | ६२९२३०४ | ६३००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |
| ६ | रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील परसुले क्षेत्रपाल रस्ता इजिमा-१६२ वरील कि.मी. ०/८०० मधील पुलाचे बांधकाम करणे व जोड रस्त्याचे बांधकाम करणे. (नाबार्ड-२७) | ७३७३३५० | ७४००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |
| ७ | रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील आड ताम्हाणे किन्नेश्वर गांव रनपाट घाट रस्ता (किनेश्वर गांव ते पेढावाडी) ग्रामा-२५ कि.मी.९/०० ते ९/२०० मध्ये दोन पुलाचे बांधकाम करणे. व जोड रस्त्याचे बांधकाम करणे. (नाबार्ड-२७) | ९४५७९४१ | ९५००० | ११२०/- | १२ महिने | वर्ग चार व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०७/०६/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २२/०६/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा : रायगड यांचे कार्यालयात दिनांक २४/०६/२०२२ वेळ ११.०० वाजता |

टिप : परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळावरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२४४४
दिनांक : २५/०५/२०२२
क्रमांक : आरओसी २०२२-२३/क्र-५/सी १०८०

**सही/-**
**(एम.आर.नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मत्स्यप्रक्रिया या विषयावर लाभार्थींचे प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था किल्ला, ता.रोहा येथे प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेतंर्गत मत्स्यप्रक्रिया याविषयावर लाभार्थींचे प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आले.

आत्मा,रायगड उपसंचालक सतिश बोराडे सदर प्रशिक्षणाचा लाभ घेऊन रायगड जिल्ह्यामध्ये महिला उद्योजक तयार व्हावेत त्यासाठी सर्वातोपरी सहकार्य करेल अशाप्रकारचे अवाहन केले.तद्नंतर संस्थेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. एस.बी.पतंगे यांनी उद्योजकता वाढीसाठी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेतंर्गत सदर प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त महिलांनी व महिला बचत गटांनी लाभ घेऊन स्वयंरोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होतील त्यादृष्टीने प्रयत्न करावा, असे सांगितले. तर खार जमिन संशोधन केंद्र पनवेल येथील डॉ. विवेक वर्तक संशोधन अधिकारी (मत्स्य) यांनी लाभार्थ्यांना मत्स्य संवर्धन व प्रक्रिया या विषयावर तांत्रिक मार्गदर्शन केले.

काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था किल्ला, ता.रोहा या संस्थेतील तज्ञ प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. एस.बी.स्वामी,डॉ. पी.पी.रेळेकर,डॉ. जी.डी. शिर्के,डॉ. आय.एल.परदेशी,सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. सी.रणवीर,सहाय्यक प्राध्यापक एन.बी.राठोड,श्रीमती आर.एम.जाधव,जी.ए.वाईकर,राहुल जोशी जिल्हा समन्वयक (पी.एम.एफ.एम.ई.) आदींनी उपस्थिती दर्शवून लाभार्थ्यांना विविध प्रक्रिया विषयावर तांत्रिक तसेच प्रात्याक्षिकांसह माहिती दिली.

सदर प्रशिक्षणाचा एकूण ३० लाभार्थ्यांनी लाभ घेतला. तर प्रशिक्षणाचे आयोजन व यशस्वीतेसाठी जिल्हा अधिक्षक क्रुषी अधिकारी उज्वला बाणखेले यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले व डॉ. जे.एन.कदम सहयोगी प्राध्यापक काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था किल्ला, ता.रोहा यांनी उपस्थितीतांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची यशस्वीरीत्या सांगता करण्यात आली.

## वाहतूक पोलिसांमुळे वाचले चालकाचे प्राण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

द्रुतगती महामार्गावरून मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या एका वाहनचालकासाठी वाहतूक पोलिस देवदूत ठरले आहेत. वाहन चालवताना अचानक हृदयविकाराचा सौम्य झटका आलेल्या या चालकावर वाहतूक पोलिसांनी वेळीच प्राथमिक उपचार केले. त्याला पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्याने त्या वाहनचालकाचे प्राण वाचल्याने वाहतूक कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांवरून कौतुक केले जात आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून एक वाहनचालक मुंबईच्या दिशेने येत असताना त्याला हृदयविकाराचा सौम्य झटका आला. यावेळी द्रुतगती महामार्गावरील शेडुंग फाटा किलोमीटर ९ वर तैनात असलेले वाहतूक विभागाचे कर्मचारी धनाजी शिंदे, रघुनाथ ढगे आणि नितीन कारखिले यांच्या लक्षात आले. त्यांनी वैद्यकीय प्रशिक्षणाचा उपयोग करून चालकावर आपत्कालीन उपचार केले. त्यानंतर त्या व्यक्तीला रुग्णालयात तत्काळ दाखल केले.

# हरण्याची भीती कधीच बाळगू नका : हर्षदा चेरफळे

हर्षदा दिलीप चेरफळे, जन्म रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील उणेगाव येथे. इयत्ता ०१ ली ते १२ वी चे शिक्षण श्रीवर्धन मधील डॉ.ए.आर.उन्ड्रे इंग्लिश हायस्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, बोर्लीपंचतन या शिक्षण संस्थेत पूर्ण झाले. विशेष म्हणजे रॉयल एज्युकेशनल सोसायटी, बोर्लीपंचतन चे अध्यक्ष डॉ.ए.आर.उन्ड्रे यांनी हर्षदाचे इयत्ता ०१ ली ते १२ वी पर्यंतचे शिक्षण मोफत करून दिले.

इयत्ता १० वी मध्ये घरातील बोली भाषा मराठी असूनही इंग्रजीबरोबर दुसरी भाषा उर्दू या विषयाची निवड करून तिने उर्दू विषयात सर्वाधिक गुण मिळविले. हर्षदाला मुळातच शिक्षणाची खूप आवड होती. परिस्थितीनुसार आपल्याला ध्येयापर्यंत कसे पोहोचता येईल, याचाच विचार ती नेहमी करायची. तिने आजपर्यंत कोणत्याही विषयाचे कोचिंग क्लासेस, गाईड, अपेक्षित संचाचा वापर केला नाही. तिच्याही मनात इतर विद्यार्थ्यांसारखे कोचिंग क्लासेस लावण्याविषयी, गाईड-अपेक्षित संच खरेदी करण्याची इच्छा होत होती, हे नसल्याने अभ्यासात मागे पडण्याची भीती असायची, मात्र घरची आर्थिक परिस्थिती तितकीशी चांगली नसल्याने तिने आपल्या या इच्छांना आवर घातला. मनात ध्येय गाठण्याची जिद्द निर्माण केली अन् ती कायम केली. तिचे स्वतःचे घोषवाक्य आहे - कमजोरी हीच आपली ताकद, आजचा संघर्षच आपली उद्याची ताकद बनते.

हर्षदा फक्त आणि फक्त पाठ्यपुस्तकाचे नियमित सखोल वाचन, सराव, गुरुजनांचे मार्गदर्शन व आपल्या आई-वडिलांच्या आशिर्वादाने प्रत्येक क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवू लागली. तिचे अथक परिश्रम व बुद्धीमत्तेच्या जोरावर विविध क्षेत्रात ती यश मिळवू लागली.

हर्षदाला कला, क्रीडा, वक्तृत्व स्पर्धा, वाचन, लेखन आणि समाजसेवेची मनापासून आवड आहे. आपल्या प्रत्येक आवडीमध्ये तिने विशेष कौतुकास्पद कामगिरी करून अनेक बक्षिसे, प्रमाणपत्रे मिळविली.

हर्षदाची खरी इच्छा डॉक्टर बनण्याची होती. मात्र परिस्थितीमुळे ती पुढे जाऊ शकली नाही. मात्र वैद्यकीय क्षेत्राची आवड असल्याने तिने हार न मानता मायक्रोबायलॉजी हा विषयाची निवड करून पी.एन.पी. महाविद्यालय, अलिबाग या ठिकाणी २००८ या वर्षात प्रवेश घेतला. अलिबाग या ठिकाणी राहण्याची सोय नव्हती. त्यावेळेस शासकीय मुलींचे वसतीगृहाच्या गृहपाल श्रीमती उषा गुजेला यांची भेट घेतली. समाजकल्याण सहाय्यक आयुक्त सुनील जाधव व श्रीमती गुजेला यांनी हर्षदाला शासनाच्या शासकीय वसतिगृह प्रवेश योजनेची इत्यंभूत माहिती दिली, व्यवस्थित मार्गदर्शन केले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर शासकीय मुलींच्या वसतिगृहात प्रवेश मिळाला. हर्षदाच्या बुद्धीमत्तेमुळे तेथील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचेही तिला उत्तम मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

परिस्थितीमुळे करावा लागलेला संघर्ष, मात्र संघर्षातही न ढळता जिद्दीने लढण्याची आई-वडिलांकडून मिळालेली उत्तम शिकवण प्रत्येक क्षणी मार्गदर्शक ठरली. समाजसेवा करण्याची त्यांची शिकवण हृदयात कायम असल्याने समाजसेवा करण्यासाठी हर्षदा लहानपणापासूनच तयार झाली. आपल्यासारखे असंख्य विद्यार्थी आहेत ज्यांना उत्तम मार्गदर्शनाची गरज आहे, हे ओळखून वसतीगृहामध्येच राहत असताना सोबतच्या इतर मुलींना इंग्रजी, गणित व विज्ञान या विषयांबाबत सोप्या पद्धतीने मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये या विषयांचा अभ्यास करण्याची गोडी निर्माण केली. हर्षदा स्वतःचा अभ्यास तिच्या इतर सहकारी झोपल्यानंतर रात्री ११ ते पहाटे ०३.०० वाजेपर्यंत करायची. यासाठी तिने आवश्यक त्या सर्व परवानग्या घेतल्या. हर्षदा अभ्यासाबरोबरच वसतीगृहामध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात स्वतः पुढाकार घेऊन त्याचे उत्तम सादरीकरण करायची आणि उपस्थित मान्यवरांच्या कौतुकाला पात्र ठरायची. हर्षदाने पी.एन.पी. महाविद्यालयात प्रथम वर्षापासूनच अ+ ग्रेड मिळवून नेहमीच प्रथम क्रमांक पटकाविला. अगदी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षीही ज ग्रेड मिळवून ती महाविद्यालयात प्रथम आली.

याबरोबरच हर्षदा रायगड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. महाविद्यालयाने तिचे सन्मानपत्र देवून तिला गौरविले. ही बातमी मिळताच वसतीगृहातील गृहपाल मॅडमनी हर्षदाबद्दल पहिली प्रतिक्रिया व्यक्त केली ती म्हणजे, आमच्या हॉस्टेलची लिटिल स्टार.

हर्षदाने हे उत्तुंग यश मिळवूनही यापुढेही माझी समाजसेवेची आवड मी टिकवून ठेवीन. माझ्यासारख्या असंख्य गरजू विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन मिळेल, यासाठी प्रयत्नशील राहीन, वैद्यकीय क्षेत्रात उत्तम काम करून समाजसेवेचे कार्य कायम करीत राहीन, अशी इच्छा व्यक्त केली. शेवटी हर्षदाने आजच्या युवक-युवतींना संदेश दिला आहे की, हरण्याची कधीच भीती बाळगू नका, प्रत्येक निर्मितीची सुरूवात शून्यापासूनच होते. आपण प्रामाणिक प्रयत्न केल्यास एक दिवस तरी यश मिळणारच, हे निश्चित..!

महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनी (दि.०१ मे २०२२) हर्षदाचा विशेष सत्कार केला. हर्षदाच्या शालेय जीवनापासूनच्या आतापर्यंतच्या यशाची दखल अनेक वृत्तवाहिन्यांनी घेतली आहेच तसेच तत्कालीन शिक्षणमंत्री श्री.विनोद तावडे व मंत्री, भारी उद्योग एवं लोक उद्यम, भारत सरकार श्री.अनंत गीते यांनी हर्षदाला प्रमाणपत्र देवून तिच्या पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

स्वतःशी प्रामाणिकपणा, देवाचा आशिर्वाद, आई-वडिलांचे संस्कार, गोड माणसांची सदैव साथ आणि अपयशाच्या अन् निराशेच्या गर्तेत असताना मनात आशेचा दिवा लावून यशाचा मार्ग दाखवतो तो सद्गुरू या सर्वांच्या एकत्रित निर्माण होणाऱ्या उर्जेने स्वतःच्या कर्तृत्वाने स्वतःसह इतरांचेही आयुष्य यशस्वी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या हर्षदाला पुढील वाटचालीस शुभेच्छा..!

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

## भारतीय रिझर्व बँकेतर्फे अलिबागमध्ये आर्थिक साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

वित्तीय समावेशन आणि विकास विभाग, रिझर्व बँक ऑफ इंडिया, मुंबई प्रादेशिक कार्यालय यांच्या वतीने आणि बँक ऑफ़ इंडिया यांच्या सहकार्याने हॉटेल होरिजन, खडताळ ब्रिज, अलिबाग - रेवस रोड, वरसोली, अलिबाग, रायगड येथे दि.०६ जून २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता आर्थिक साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश समाजातील इतर घटकांना बचतीचे महत्त्व, व्यवसायाची उभारणी, बँकामार्फत व्यवसायासाठी लागणारे आर्थिक सहाय्य, मालासाठी तयार करावयाची घरगुती व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, निर्यातीसाठी आवश्यक मार्गदर्शन व उपलब्ध असलेल्या सरकारी योजना, इत्यादी बाबींवर सविस्तर चर्चा आणि मान्यवर व्यक्तींकडून मार्गदर्शन हा आहे.

प्रादेशिक संचालक महाराष्ट्र, भारतीय रिजर्व बँक, मुंबई अजय मिचयारी, महाव्यवस्थापक, भारतीय रिज़र्व बँक, मुंबई प्रादेशिक कार्यालय, श्रीमती कल्पना मोरे, महाव्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया सुब्रतो कुमार रॉय, श्रीमती शंपा बिस्वास, क्षेत्रीय प्रबंधक, बैंक ऑफ इंडिया, समरेश शाहा , श्रीमती कावेरी पवार आणि कु. स्नेहल विचारे, एमएसआरएलएम, डीडीएम नाबार्ड तसेच भारतीय रिज़र्व बँकचे अधिकारी अशा मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

त्याचबरोबर भारतीय रिज़र्व बँकेकडून वेळोवेळी ठइख कहता है या जनजागृती उपक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या सामाजिक सुरक्षा, सुरक्षित बॅकिंग व्यवहार, डिजिटल बॅकिंग ला प्राधान्य, स्वच्छ चलन धोरण तसेच चलनाचा मान कसा राखावा, याचे मार्गदर्शन, बँकिंग लोकपालांची कार्यप्रणाली, बँक खातेधारकाचे अधिकार इत्यादी बाबींवर सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

## नदीतील गाळ काढल्याने मांडला गावाला दिलासा

### प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन केली पाहणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**



मुरुड तालुक्यातील ग्रामीण भागातील मांडला ग्रामपंचायत हद्दीतील नदीमध्ये अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गावाला उद्भवणारा संभाव्य पूराचा धोका लक्षात घेऊन नदीतील गाळ काढल्याने मांडला गावाला दिलासा मिळाला असून नुकतीच प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केल्याने समाधान व्यक्त होत आहे.

यावेळी प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी ग्रामपंचायत कार्यालयात भविष्यात आपत्ती व्यवस्थापन दृष्टीकोनातून झालेल्या बैठकीत नदीतील गाळ उपसा कामाबाबत समाधान व्यक्त करुन पुढील कामाबाबत मार्गदर्शक सूचना केल्या व नदीतील उर्वरित राहिलेला गाळ काढण्यासाठी शासनस्तरावर योग्य ते सहकार्य केले जाईल.असे सांगितले.

गेल्या अनेक वर्षांपासून मांडला नदीत मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने गावाला पुराच्या पाण्याने धोक्याला सामोरे जावे लागून नुकसानीला तोंड द्यावे लागले होते.या नदीतील मोठ्या प्रमाणात साचलेला गाळ काढण्यात यावा.यासाठी ग्रामस्थांच्या वतीने सरपंच सुचिता सुरेश पालवणकर यांनी अलिबाग-मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी, जिल्हाधिकारी,प्रांताधिकारी व तहसीलदार यांजकडे निवेदन देण्यात येऊन सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.परंतु या कामाला उशीर होत असल्याने व पावसाळा ऐन तोंडावर आल्याने तसेच मागील दि.६ सप्टेंबर रोजी झालेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये. यासाठी सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, सदस्या, कर्मचारी व ग्रामस्थ यांनी मागील ग्रामसभेमध्ये असगर दळवी यांच्या सुचनेनुसार सरपंच यांनी तातडीने दखल घेऊन ग्रामपंचायत स्तरावर योग्य तो निर्णय घेऊन कामाला सुरुवात करण्यात आली व आजही काम प्रगतीपथावर आहे.याबद्दल ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.याकामी आमदार महेंद्रशेठ दळवी, प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसीलदार रोहन शिंदे तसेच रोहा-कोलाड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता धाकतोडे यांचे सहकार्य लाभत आहे.

अशाच प्रकारे तालुक्यातील उसरोली व आदाड याठिकाणी सरपंच मनीष नांदगावकर व अनवारे यांच्या सहकार्याने नदीतील गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार रोहन शिंदे यांनी दिली. मांडला नदीतील गाळ काढण्याकामी येथील प्रकल्प विकासक तैजून निसार हन्सोजी यांनी सरपंच सुचिता पालवणकर यांच्या विनंतीवरून लागणारी यंत्रसामुग्री नदीपात्र साफ होईपर्यंत विनामोबदला उपलब्ध करून दिली असून भविष्यात यापुढे काम पूर्ण होईपर्यंत योग्य ते सहकार्य देण्याचे वचन हन्सोजी यांच्यावतीने जाहीद कादीरी यांनी दिले आहे.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच सुचिता पालवणकर, उपसरपंच राजेश पाटील, सदस्य धर्मेंद्र गायकवाड, बशीर गोरमे, सुहासिनी थळे, दिशा नांदगावकर, गीता नागोटकर, अपेक्षा पालवणकर, फौजिया शेख, अनुसया नाईक, कर्मचारी वृंद,असगर दळवी,म.सईद पंचूलकर, खलिल नाईक,शादाब घय्ये, एजाज दळवी, निसार नाईक, शैलेश रातवडकर, सुरेश पालवणकर,सलीम तांडेल,मजीद दळवी, महेंद्र कदम,शबाब दळवी, निसार दळवी ग्रामस्थ उपस्थित होते.

## जमिनीच्या वादातून दोघाजणांना केली जबरी मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जमिनीच्या वादातून सात ते आठ जणांनी मिळून दोघं जणांना घरात घुसून जबरी मारहाण करून जीव ठार मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी तसेच घरातील साहित्याची तोडफोड केल्याने याबाबतचा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील भल्याचीवाडी येथे राहणारे बामी भगत (वय ७०) व राजू भगत (वय ३५) यांना आरोपींनी जमिनीच्या वादातून इतर सात ते आठ इसमांचा बेकायदेशीर जमाव जमवून या दोघांना जीवे ठार मारण्याच्या इराद्याने हत्यारानिशी त्यांच्या घरात घुसून त्यांना धमकावून धारदार चाकू सारख्या हत्याराने वार तसेच जबरी मारहाण करून जीव ठार मारण्याचा केला.


### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की श्री. निलेश नारायण राणे, प्लॉट नंबर. १०१, रूम. नंबर. १०२, साई शृत को - ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी एलटीडी. पहिला मजला, आसुडगाव, ता. जि. रायगड. पिन नंबर ४१०२०६. यांचे सदर सदनिकेचे खरेदीखत कागदपत्र ०५/०६/२०२१ रोजी हरविले / गहाळ झाले आहे. तसेच याची तक्रार खांदेश्वर पोलीस स्टेशन मध्ये ०३/०८/२०२१ या दिवशी देण्यात आली आहे. कोणालाही वरील नमूद कागदपत्र सापडल्यास १५ दिवसाच्या आत ९८७०५५८१९७ / ९६६४९७८४२९ या क्रमांकावर कळविण्यात यावे.

**सही/-**
**अर्जदारातर्फे वकील**
**अॅड. विजया शिंदे**
**ऑफिस नं.२, नालंदा को.ऑप.हौ.सो., सेक्टर १८, प्लॉट नं.२४, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं. ८९७६७२०१७०**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते आहे की, आमचे अशिल मे.एन.डी.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी मौजे : पळसदरी, ता.कर्जत, जि.रायगड येथील पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ३१, हिस्सा नं.७ | ०-१३-००<br>पो.ख. ०-०७-००<br>एकूण क्षेत्र ०-२०-०० | ०.०८ |

वर नमूद केलेल्या मिळकती सोयीकरिता ''सदर मिळकती'' असे संबोधण्यात येईल. सदर मिळकतीचे मालक श्री.वसंत दत्तात्रय महाडिक, रा.मौजे : पळसदरी, ता.कर्जत, जि.रायगड यांच्याकडून विकत घेण्याचे आमचे अशिल मे.एन.डी.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी ठरविले आहे.

सबब, या जाहीर नोटीसीने सर्व लोकांना कळविण्यात येत की, सदर मिळकतीवर कोणाचेही साठेकरार, खरेदी विक्री, गहाण, लिज, लिन, पोटगी, ताबाकब्जा, बोजा, दावा, कोर्ट प्रकरण, कोर्ट जप्ती, मृत्यूपत्रांकित दान व गहाण, बँक वसुली, फरोक्तखत, वारसहक्क व अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यासही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत मे.एन.डी.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. खरेदीदार यांच्यातर्फे अॅड.राजेंद्र एस. भानुशाली यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने खालील दिलेल्या पत्यावर पाठविणेची विनंती आहे. येणेप्रमाणे मुदतीत हरकत दाखल न झाल्यास सदरच्या मिळकती निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून सदर मिळकतीचे आमचे अशिल खरेदीचा व्यवहार करतील, त्यानंतर त्याबाबत कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राह्य धरता येणार नाही व मुदतीनंतर येणारी तक्रार आमच्या अशिलांच्या हक्कांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली.

दि.०३/०६/२०२२

**सही/-**
**अॅड.राजेंद्र एस. भानुशाली**
**कार्यालयीन पत्ता : ५८१/अ, सुर्यासदन, २ रा माळा, हरी पांडव पथ, कुंभारवाडा रोड, उरण, ता.उरण, जि.रायगड ४००७०२**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील व्यक्तीचे नाव असलेली ताबे कब्जातील तसेच मालकी हक्काची भोगवटादार वर्ग-१ स्वरुपाची खालील वर्णनाची शेतजमीन आमचे अशिलांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे : शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड**

| कब्जेदार/ मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| अ) श्री.जगदीश लक्ष्मण ममदापूर<br>ब) श्री.रोहित गोपाळ आमीन<br>क) श्रीमती.जननी गोपाळ आमीन | १८८ | २ | ०-०४-९०<br>पो.ख.०-०१-९६<br>एकूण ०-०६-८६ | १.५७ |
| अ) श्री.जगदीश लक्ष्मण ममदापूर<br>ब) श्री.रोहित गोपाळ आमीन<br>क) श्रीमती.जननी गोपाळ आमीन | १८८ | ३ | ०-०९-३०<br>पो.ख.०-०१-३०<br>एकूण ०-१०-६० | २.४१ |
| | | | एकूण ०-१७-४६ | ३.९८ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, एमओयु, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रर, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतींचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.०४/०६/२०२२

**सही/-**
**अॅड.शार्दुल चंद्रकांत दळवी**
**बी.एस.सी. (केमिस्ट्री), एल.एल.बी.**
**पर्ल कॅसल को.ऑप.हौ.सो., ऑफिस नं.४ साईनगर रोड, जुने पनवेल-४१०२०६**
**मो.नं.७२०८६८५५४५**

### माणगांव नगरपंचायत, माणगांव

ता.माणगांव, जि.रायगड, पिनकोड ४०२१०४ Email : nagarpanchayatmangaon@gmail.com, फोन नं.०२१४०२६३०५६

जा.क्र.मानपं/जा.नि./२९२/२०२२-२३ दिनांक : ०३/०६/२०२२

### जाहीर निविदा / फेर निविदा सूचना

निम्ननिर्देशित कामाकरिता इच्छुक ठेकेदारांकडून दोन लखोटा पद्धतीने सिलबंद निविदा खाली नमूद कालावधी पर्यंत मागविण्यात आले आहेत. कोरी निविदा मागणी अर्ज खाली नमूद कालावधीपर्यंत लेखी स्वरुपात माणगांव नगरपंचायत कार्यालयात कोरी निविदा पत्राची फी (ना परतावा) भरुन मिळू शकतील. निविदा फॉर्म करिता माणगांव नगरपंचायत कार्यालयात संपर्क साधावा.

| अ.क्र. | कामाचे नांव | कालावधी | इसारा रक्कम | निविदा विक्रीची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | माणगांव नगरपंचायतीस कार्यालयीन स्टेशनरी साहित्याचा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे. | दि.०६/०३/२०२२ ते २०/०३/२०२२ | ५,०००/- | १,०००/- |
| २ | माणगांव नगरपंचायतीस छापिल स्टेशनरी साहित्याचा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे. | दि.०६/०३/२०२२ ते २०/०३/२०२२ | ५,०००/- | १,०००/- |
| ३ | माणगांव नगरपंचायतीच्या सर्व वाहनांची देखभाल व दुरुस्ती करणे. | दि.०६/०३/२०२२ ते २०/०३/२०२२ | ५,०००/- | १,०००/- |
| ४ | माणगांव नगरपंचायतीला विविध कामासाठी जेसीबी, क्रेन, पोकलेन, ट्रक, डंपर, ट्रॅक्टर इत्यादी वाहन व यंत्रसामुग्री पुरवठा करणे. | दि.०६/०३/२०२२ ते २०/०३/२०२२ | ५,०००/- | १,०००/- |
| ५ | माणगांव नगरपंचायतीस सन २०२२-२३ करिता न्यायायलीन कामकाजासाठी कायदेशीर सल्लागार नेमणे. | दि.०६/०३/२०२२ ते २०/०३/२०२२ | ५,०००/- | १,०००/- |
| ६ | माणगांव नगरपंचायत कार्यालयातील कर्मचारी करिता रेनकोट पुरवठा करणे. | दि.०६/०३/२०२२ ते २०/०३/२०२२ | ५,०००/- | १,०००/- |
| ७ | माणगांव नगरपंचायत कार्यालयातील युपीएस-इन्वर्टर यंत्रणाची देखभाल व दुरुस्ती करणे. (फेरनिविदा क्र.२) | दि.०६/०३/२०२२ ते १३/०३/२०२२ | ५,०००/- | १,०००/- |
| ८ | माणगांव नगरपंचायत विद्युत विभागातील पथदिवे क्लॅम्प पुरवठा व अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे. (फेरनिविदा क्र.१) | दि.०६/०३/२०२२ ते १३/०३/२०२२ | १,०००/- | १००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

वरील कामांच्या निविदा बाबतची अटी, शर्ती व निविदा फॉर्म माणगांव नगरपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

**सही/-** मुख्याधिकारी, माणगांव नगरपंचायत | **सही/-** उपनगराध्यक्ष, माणगांव नगरपंचायत | **सही/-** नगराध्यक्ष, माणगांव नगरपंचायत

# संक्षिप्त...

## लोकलमधील वाढत्या तृतीयपंथीयांच्या वावरामुळे प्रवासीवर्ग त्रस्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्या पनवेल येथे येणाऱ्या तसेच पनवेल येथून जाणाऱ्या लोकलमध्ये तृतीयपंथाचा वावर वाढला असून त्यामुळे प्रवासीवर्गामध्ये व प्रामुख्याने महिला प्रवासीवर्ग त्रस्त व भीतीयुक्त वातावरणात आहेत.

पनवेल–वाशी–ठाणे ट्रान्स हार्बर मार्गावरुन लोकलने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना डब्यात येणाऱ्या तृतीय पंथीयामुळे नाहक त्रास सोसावा लागत आहे. पैसे मागण्यासाठी दिवसभर या तृतीय पंथीयांचा वावर या मार्गावरील लोकलमध्ये असतो. जोरजोरात टाळ्या वाजविणे, एखादी महिला लोकलमध्ये असली तरी तिच्याकडे त्याच प्रमाणे तरुण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडे पैशासाठी तगादा लावणे, असे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे प्रवासी त्रस्त झाले आहे. या तृतीयपंथीयावर रेल्वे पोलिसांकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे त्यांचे प्रमाण हे वाढल्याचे प्रवाशांनी सांगितले.

# माथेरान बस स्टँडकडे जाणारा रस्ता लिदमुक्त

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचे प्रवेशद्वार दस्तुरीनाका येथे जाण्यासाठी चेडोबा मंदिर ते बस स्टँड ह्या रस्त्यावर मागील एक वर्षापासून लिदिचा थर साचला होता पण आज माथेरानच्या मुख्याधिकारी सौ. सुरेखा भणगे शिंदे यांच्या आदेशावरून ह्या रस्त्यावर साचलेली दोन ते तीन इंच लिदीचा थर आज नगरपालिका कर्मचाऱ्यांनी काढून हा रस्ता स्वच्छ केला आहे.



माथेरान येथे प्रवासाचे मुख्य वाहन म्हणून घोड्यांचा वापर केला जातो व हे घोडे उभे करण्यासाठी माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तूरीनाका येथे कोठेही घोडे स्टँड दिलेले नाही त्यामुळे हे घोडे मुख्य रस्त्यांवर उभे केले जात होते पण त्यामुळे त्याच्या मल मुत्रामुळे मुख्य रस्त्यावर घाणीचे साम्राज्य दिसून यायचे व ह्या परिसरात झाडांना घोडे बांधल्याने अनेक मोठी झाडे मृत होऊन पडायला लागली होती माथेरानमध्ये प्रवेश करताच ह्या घोड्यांच्या मलमुत्राच्या दुर्गंधीने पर्यटक व स्थानिकांना त्रास होत होता त्यामुळे ह्या रस्त्यांवर घोडे बांधण्यास बंदी करण्यात आली होती.

तेव्हा ह्याच ठिकाणच्या घोडे वाल्यांनी येथील चेडोबा मंदिर ते टॅक्सी स्टँडला समांतर असलेल्या रस्त्यावर कब्जा घेऊन येथे घोडे उभे करण्यास सुरवात केली ह्या ठिकाणी सफाई कर्मचारी नसल्याने व घोडेवाले ही स्वतःच्या घोड्यांची मलमूत्र उचलत नसल्याने येथे लालमातीच्या जागी लिद मिश्रित गवताच्या विष्ठेंचा थर साचू लागला होता हा थर इतका वाढला होता की येथे चालताना गालिच्यावर तर चालत नाही ना असा भास होत असे आणि पावसाळ्यात तर तीन ते चार इंच घोड्यांच्या विष्ठेमधून रस्ता शोधावा लागत होता त्यामुळेच ह्या रस्त्याविषयी नगरपालिका कडे अनेक वेळा तक्रारी केल्या जात होत्या पण त्याचा काहीही उपयोग होत न्हवता पण माथेरानमध्ये असलेल्या मुख्याधिकारी सौ. सुरेखा भणगे शिंदे यांनी मात्र हा रस्ता लीदमुक्त करण्याचा आदेश नगरपालिका कर्मचाऱ्यांना दिला व आज हा रस्ता लिद मुक्त झाला असून येथून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना आता दुर्गंधीयुक्त रस्त्यातून सुटका मिळणार असल्याने माथेरान करांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

> पावसाळ्यामध्ये ही दुर्गंधी वाढून आरोग्यला धोका निर्माण झाला असता,, बरेच पर्यटक, हात रिक्षा चालक, घोडे वाले, कुली, आणि मालवाहतूक करणारे या मार्गने जातात.त्यामुळे त्वरित निर्णय घेऊन सदरील लिद काढण्यात आली असून इथून पुढे नियमित या रस्त्याची स्वछता नगरपरिषद कडून राखाली जाईल तश्या सूचना स्वछता विभागाला देण्यात आल्या आहेत.
>
> **सुरेखा भणगे -शिंदे, मुख्याधिकारी तथा प्रशासक माथेरान**

## अखेर त्या वडाच्या झाडाच्या फांद्या तोडण्यात यश

**दै.रायगड नगरी । चौक**

गेले अनेक महिने चौक गावातील लोहोप –चौक कॉर्नर वर असलेले वडाच्या झाडा मुळे नागरिकांना धोका निर्माण झाला होता.या वडाच्या झाडाच्या फांद्या जवळच असलेल्या विद्युत खांबा मध्ये संपूर्ण शिरल्या होत्या.त्यामुळे येथील विद्युत तारांचा धोका भर बाजारपेठेत असलेल्या वर्दळीच्या ठिकाणी झाला होता.



या असलेल्या झाडामुळे पादचारी, नागरिक यांना धोका निर्माण झाला होता.त्यामुळे विद्युत तारांमध्ये असलेल्या या फांद्या जोराने हलताना विद्युत तारेमधून सगळ्या ठिणग्या उडत होत्या, वारंवार ग्रामपंचायत चौक मध्ये स्थानिक आदर्श मित्र मंडळ कोल्हापूर पेठ येथील जागृत नागरिक निखील मालुसरे, तन्वीर शेख, गणेश खोपटकर, पत्रकार अनिल भरतुक,ईशान शेख यांनी लेखी अर्ज देऊन पाठपुरावा केला होता.तरी देखील झाडांच्या फांद्या तोडण्यात येत नव्हत्या. झाड तोडण्यासाठी माणसे मिळत नाहीत किंवा ते काम आमचे नाही ते काम महावितरणाचे आहे.अशी उत्तरे देण्यात येत होती त्याच वेळी जि. प.सदस्य मोतीराम ठोंबरे व ज्येष्ठ कार्यकर्ते श्याम भाई साळवी यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यावर त्यांनी त्वरित ग्रामपंचायतीशी फोनद्वारे संपर्क साधून पावसाळ्याच्या आत मध्ये ते झाड तोडून घ्या असे सांगितले त्यानंतर अल्पावधीत काळातच झाडाच्या फांद्या तोडण्यात आल्या.येथील नागरिकांना होणारा धोका टळल्याने सर्वांनी आभार व्यक्त केले.

## शहिद राकेश सावंत यांचा तेरावा स्मृतीदिन सोमवारी रस्त्याच्या आश्वासनाची अद्याप पूर्तता नाही

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहरातील अमरनगर येथील शहिद राकेश तात्याबा सावंत यांचा तेरावा स्मृतीदिन येत्या सोमवारी दि. ६ जुन २०२२ रोजी साजरा करण्यात येणार आहे. शहिद राकेश सावंत यांचे शेतांच्या बांधावरून पार्थिव महामार्गालगतच्या स्मशानभुमीपर्यंत नेताना प्रशासनाने शहिद सावंत यांच्या घरापर्यंत रस्ता करून देण्याचे दिलेले आश्वासन अद्याप अपूर्णच असल्याने शहिद कुटूंबियांमध्ये नाराजी दिसून येत आहे.

पोलादपूर शहरातील शहिद राकेश सावंत यांचा देशसेवेदरम्यान झालेल्या वीरमरणानंतर तत्कालीन आमदार स्व. माणिकराव जगताप, तत्कालीन जि.प.सदस्य व विद्यमान आमदार भरत गोगावले तसेच माजी मंत्री स्व.प्रभाकर मोरे आदींनी शहिद कुटूंबियांच्या घरापर्यंत रस्ता करण्याची ग्वाही देऊन प्रशासनाला आदेश दिले होते. मात्र, तेव्हापासून आजतागायत यासंदर्भात कोणतीही कारवाई न झाल्याने वीरपिता तात्याबा सावंत आणि कुटूंबियांमध्ये तीव्र नाराजी दिसून येत आहे.

सोमवार, दि. ०६ जुन रोजी सकाळी मुर्तीपूजन झाल्यानंतर तुर्भे येथील ह.भ.प.हरीभाऊ शिंदे महाराजांची किर्तनसेवा होणार आहे. दुपारी ११ ते १२ वाजेपर्यंत श्रध्दांजलीचा कार्यक्रम झाल्यानंतर भोजन पंगतीचा लाभ सर्वांनी घ्यावयाचा आहे, अशी माहिती वीरपिता तात्याबा सावंत आणि वीरमाता सौ. जयश्री सावंत यांनी दिली. यावेळी श्रध्दांजलीच्या कार्यक्रमाला आ.भरत गोगावले, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, पं.स.सभापती नंदा चांदे, उपसभापती शैलेश सलागरे, तहिसलदार दिप्ती देसाई, माजी नगराध्यक्षा सुनिता पार्टे, सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव, नगराध्यक्षा सोनाली गायकवाड, काटेतळी येथील कॅप्टन दत्ताराम मोरे आणि शहरप्रमुख सुरेश पवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



# पनवेल येथे नवीन स्टुडिओ सुरू करण्याची पेपरफ्रायची घोषणा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ईकॉमर्स फर्निचर आणि गृहोपयोगी वस्तू कंपनी पेपरफ्रायने नवी मुंबईतील पनवेल येथे आपला नवीन स्टुडिओ सुरू करण्याची घोषणा केली आहे. ऑफलाइन विस्तार हा भारतातील विशिष्ट बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याच्या आणि घर आणि राहत्या बाजारपेठेत सर्वदूर व्यवसाय उभारणीच्या कंपनीच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने आहे. पेपरफ्रायच्या स्टुडिओचा विस्तार सध्या देशातील १६० हून अधिक स्टुडिओसह ८० हून अधिक शहरांमध्ये पसरलेला आहे.

कंपनीने २०१४ मध्ये आपला पहिला स्टुडिओ सादर केला. प्रम्भा एंटरप्रायझेसच्या भागीदारीत सुरू केलेला नवीन स्टुडिओ पनवेलमधील ओरियन मॉलच्या समोर एका प्रमुख ठिकाणी ५२६ चौरस फूट चटईक्षेत्रात वसलेला आहे. पेपरफ्राय वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या १ लाखाहून अधिक उत्पादनांच्या भिन्न पोर्टफोलिओमधून काळजीपूर्वक निवडलेल्या फर्निचर आणि घरगुती उत्पादनांच्या मोठ्या कॅटलॉगचा अनुभव ग्राहकांना प्रथमच उपलब्ध करून देतो. ग्राहकांना कंपनीच्या इंटीरियर डिझाइन सल्लागारांकडून विशेष डिझाइन सल्लाही मिळेल. पनवेल येथील स्टुडिओचे उद्दिष्ट महाराष्ट्रातील नवी मुंबई येथील घर आणि ग्राहकांच्या विशिष्ट गरजांनुसार वैयक्तिकृत खरेदीचा अनुभव प्रदान करणे हे आहे.

पेपरफ्राय फ्रेंचाइजी बिझनेस मॉडेल २०१७ मध्ये सादर झाले. पेपरफ्राय द्वारे ऑर्डरची पूर्तता आणि विक्रीनंतरची सेवा, स्टुडिओ डिझाइनला पाठबळ, सादरीकरण आणि सेटअप, कृतीशील मार्गदर्शन, विपणन आणि जाहिरातींसाठी समर्थन देते. पेपरफ्राय हायपरलोकल मागणी चक्र आणि प्रवाहांची माहिती असणाऱ्या स्थानिक उद्योजकांसोबत भागीदारी करतात. पेपरफ्राय दर महिन्याला सुमारे ८–९ फ्रेंचायझी सादर करते. जून २०२१ मध्ये सादर केलेला पेपरफ्राय अॅक्सीलेटर प्रोग्रॅम पेपरफ्रायच्या ऑफलाइन फूटप्रिंटचा विस्तार करण्यासाठी तयार करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे मोठे आगळे वैशिष्ट्य म्हणजे फ्रँचायझी भागीदारांना आवश्यक असलेले १५ लाख रुपयांपासून सुरु होणारे कॅपेक्स. हे मॉडेल १००% किमतीच्या समानतेवर आधारित आहे आणि भागीदाराला उत्पादन यादी ठेवण्याची आवश्यकता नाही, त्यामुळे ते परस्पर फायदेशीर व्यवसाय संघटन बनते.



# पनवेल परिसरात दागिने लुटमारीच्या घटनांत वाढ; लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील कामोठे व खारघर या भागात दागिने लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरटयांनी लंपास केला आहे.

कामोठे येथे सायन– पनवेल महामार्गावर पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या घटनेत रत्नागिरी येथून एसटीने कुटुंबासह उतरलेल्या रत्नमाला जाधव (६२) यांच्या अंगावरील तब्बल ६ तोळे वजनाचे ३ लाख रुपये किंमतीचे दागिने दोघा लुटारुंनी लुटून पलायन केले. यावेळी रत्नमाला यांच्या मुलाने सदर लुटारुला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, सदर लुटारु त्याच्या हाती लागले नाहीत. तर कामोठे, सेक्टर १९ मध्ये घडलेल्या घटनेत मैत्रिणीसह फेरफटका मारण्यासाठी सेक्टर २५ मध्ये गेलेल्या मीनल सारंग (६२) यांच्या गळ्यातील ६६ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र एका लुटारुने खेचून जेएनपीटी हायवेच्या दिशेने पलायन केले.

तर खारघर सेक्टर ३४ बी मध्ये सुद्धा दोघा लुटारुंनी मॉर्निंग वॉकसाठी पेठपाडा मेट्रो स्टेशनच्या खाली गेलेल्या नजमा तबरेज जमेदार (३५) या विवाहितेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून पलायन केले. त्यानंतर रात्रीच्या सुमारास मैत्रिणीसह सीबीडी, सेक्टर– ५ भागात गेलेल्या सरला देशमुख (५७) यांच्या गळ्यावर फटका मारुन त्यांच्या गळ्यातील १ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि सोन्याची चेन खेचून खारघरच्या दिशेने पलायन केले.

सदर सर्व गुन्ह्यांची कामोठे व खारघर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. या वाढत्या गुन्हेगारीमुळे सर्वसामान्यसह ज्येष्ठ नागरिक व महिला वर्गामध्ये भीतीयुक्त वातावरण पसरले आहे.

# नदीतील गाळ काढल्याने मांडला गावाला दिलासा

## प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन केली पाहणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुरुड तालुक्यातील मांडला गावाला उद्भवणारा संभाव्य पूराचा धोका लक्षात घेऊन नदीतील गाळ काढण्याचे काम तातडीने सुरु केले आहे.

ग्रामीण भागातील मांडला ग्रामपंचायत हद्दीतील नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने मांडला गावाला उद्भवणाऱ्या संभाव्य पूराच्या पार्श्वभूमीवर गावाला दिलासा मिळाला असून प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी नुकतीच प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांनी ग्रामपंचायत कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन बैठकीत नदीतील गाळ उपसा कामाबाबत समाधान व्यक्त करुन पुढील कामाबाबत मार्गदर्शक सूचना केल्या व नदीतील उर्वरित राहिलेला गाळ काढण्यासाठी शासनस्तरावर योग्य ते सहकार्य केले जाईल, असे सांगितले. या बैठकीत तहसिलदार रोहन शिंदे, सरपंच सुचिता पालवणकर, उपसरपंच राजेश पाटील व इतर सदस्य उपस्थित होते.

मांडला नदीत मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने गावाला पूराच्या पाण्यामुळे नुकसानीला तोंड द्यावे लागले होते.या नदीतील मोठ्या प्रमाणात साचलेला गाळ काढण्यात यावा, यासाठी ग्रामस्थांच्या वतीने सरपंच सुचिता सुरेश पालवणकर यांनी अलिबाग–मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, प्रांताधिकारी प्रशांत ढगे व तहसिलदार रोहन शिंदे यांच्याकडे निवेदन देवून त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.

या कामाबाबत मागील ग्रामसभेमध्ये असगर दळवी यांच्या सूचनेनुसार मांडला गावच्या सरपंच सुचिता पालवणकर, उपसरपंच राजेश पाटील तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, कर्मचारी व ग्रामस्थ यांनी तातडीने दखल घेवून ग्रामपंचायत स्तरावर योग्य तो निर्णय घेऊन कामाला तात्काळ सुरुवात केली, आजही हे काम गतीने प्रगतीपथावर आहे. या कामासाठी आमदार महेंद्र दळवी,जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार रोहन शिंदे व रोहा–कोलाड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.धाकतोडे यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. अशाच प्रकारे तालुक्यातील उसरोली व आदाड या ठिकाणी सरपंच मनीष नांदगावकर व श्री.अनवारे यांच्या सहकार्याने नदीतील गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार रोहन शिंदे यांनी दिली आहे.

मांडला नदीतील गाळ काढण्यासाठी येथील प्रकल्प विकासक तैजून निसार हन्सोजी यांनी सरपंच सुचिता पालवणकर यांच्या विनंतीवरून लागणारी यंत्रसामुग्री नदीपात्र साफ होईपर्यंत विनामोबदला उपलब्ध करून दिली असून भविष्यात यापुढे काम पूर्ण होईपर्यंत योग्य ते सहकार्य देण्याची खात्री हन्सोजी यांच्यावतीने जाहीद कादीरी यांनी दिली आहे. या गाळ उपसा कामाच्या पाहणीच्या वेळी सदस्य धर्मेंद्र गायकवाड, बशीर गोरमे, सुहासिनी थळे, दिशा नांदगावकर, गीता नागोटकर, अपेक्षा पालवणकर, फौजिया शेख, अनुसया नाईक, कर्मचारी वृंद,असगर दळवी,म.सईद पंचूलकर, खलिल नाईक,शादाब घय्ये, एजाज दळवी, निसार नाईक, शैलेश रातवडकर, सुरेश पालवणकर,सलीम तांडेल,मजीद दळवी, महेंद्र कदम,शबाब दळवी, निसार दळवी आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस आणि जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ०५ जूनला उलवा नोडमध्ये 'भव्य सायक्लोथॉन स्पर्धा'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचा आधारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७१ वा वाढदिवस आणि जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, उलवे सेना सामाजिक संस्था व सायकलिस्ट क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ०५ जून रोजी सकाळी ०६ वाजता उलवा नोडमध्ये 'भव्य उलवे सायक्लोथॉन २०२२ स्पर्धा' होणार असून या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शुक्रवारपर्यँत ७०० हून अधिक स्पर्धकांनी नोंदणी केली आहे.

सायकल चालविण्याचे अनेक फायदे आहेत, त्या अनुषंगाने सायकल संस्कृती वाढावी व सायकलबद्दल आवड निर्माण व्हावी, या हेतूने या स्पर्धेचे आयोजन उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे करण्यात आले आहे. हि स्पर्धा महिला व पुरुष प्रकारात आणि २५ किमी, १५ किमी, १० किमी व ०३ किमी अंतर या चार गटात होणार असून या स्पर्धेतील विजेत्यांना भरघोस पारितोषिकांनी सन्मानित करण्यात येणार आहे. विशेष आकर्षण असलेल्या २५ किलोमीटर अंतराच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्यास २० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये, तृतीय क्रमांकास ०५ हजार रुपये, चतुर्थ व पाचव्या क्रमांकास अनुक्रमे ०३ हजार आणि ०२ हजार रुपये तसेच पाच उत्तेजनार्थ बक्षिसे आहेत. तसेच स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकास टी शर्ट व मेडल देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.स्पर्धकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी वैद्यकीय पथकाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच या ठिकाणी झुम्बा मनोरंजनाचा लाभ प्रेक्षक व स्पर्धकांना घेता येणार आहे. त्याचबरोबर ३ ते ६ वर्षेपर्यंतच्या लहान मुलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेच्या अनुषंगाने सोसायटींसाठी विशेष स्पर्धाही होणार आहेत. त्यामध्ये स्वच्छ सोसायटी, स्पर्धेत सर्वात जास्त सहभाग, आणि ग्रीन सोसायटी या स्पर्धेचा समावेश आहे. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास अनुक्रमे १० हजार, ०३ हजार व ०२ हजार रुपये असे बक्षिस असणार आहे. या स्पर्धेत सहभाग होण्यासाठी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे ऑफलाईन तर www.rtisc.in या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात नोंदणी करता येणार आहे. अधिक माहितीसाठी ९०२९०६५५३३ किंवा ९८२०१९८३८१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# उरणच्या विविध समस्याबाबत उच्चस्तरीय समन्वय समिती पुनरुज्जीवित करण्याची उरण सामाजिक संस्थेची आदिती तटकरे यांच्याकडे मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात जवाहरलाल नेहरू बंदर हे देशातील सर्वात मोठे कंटेनर हाताळणारे बंदर आहे. या बंदराच्या १० ते १२ किलोमीटरच्या परिघात रोज २० ते २५ हजार कंटेनर आणि इतर जड वाहनांची प्रचंड वाहतूक सुरू असते.परंतु त्या प्रमाणात रस्ते आणि ईतर पायाभूत सुविधांच्या अभावामुळे या विभागात रोज जीवघेणे अपघात होत असतात. त्यामुळे आजपर्यंत ८०० हून अधिक नागरिकांना आपले जीव गमवावे लागले असून अनेक जण शारीरिक दृष्ट्या जायबंदी झाले आहेत. उरण तालुक्यात कोणतेही शासकीय सुसज्ज असे रुग्णालय नसल्याने ही समस्या अधिकच गंभीर बनली आहे. वाहतूक कोंडीमुळे येथील जनता त्रस्त झाली आहे. याच पार्श्वभूमीवर उरण सामाजिक संस्थेने फेब्रुवारी २०१३ मध्ये तत्कालीन गृहमंत्री आर आर पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले होते. त्यांच्याच मदतीने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित खात्याचे अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समन्वय समिती स्थापन होऊन पहिली बैठक १३ /५/ २०१३ रोजी मंत्रालयात संपन्न झाली. सदर बैठकीत मंजूर झालेल्या १६ मुद्यांचा पाठपुरावा करण्यासाठी समन्वय समितीच्या दोन बैठका जुलै आणि ऑगस्ट २०१३ मध्ये घेण्यात आल्या होत्या. परंतु नंतर सरकार मध्ये बदल झाल्यानंतर सदर समन्वय समितीचे कामकाज मागील आठ वर्षांपासून स्थगित झाले आहे. आता महाआघाडीचे सरकार आल्याने सदर समन्वय समितीचे कामकाज पुन्हा सुरू करावी अशी मागणी उरण सामाजिक संस्थेने रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्याकडे केली आहे.

उरण तालुक्यात जेएनपीटी सह ओएनजीसी, बीपीसीएल, मोठे मोठे सी एफ एस, इतर प्रकल्प आहेत. या प्रकल्पांचा सी एस आर फंड स्थानिक जनतेच्या कल्याणासाठी वापरण्यात यावे.१०० बेडचे सुसज्ज हॉस्पिटल करिता महाराष्ट्र शासनाकडून सद्यस्थितीत जो निधी मंजूर झाला आहे त्या अनुषंगाने भूमिपूजनाचा कार्यक्रम लवकरात लवकर व्हावा.त्या दृष्टीने युद्ध पातळीवर प्रयत्न व्हावेत. अशी मागणी पत्रव्यवहाराद्वारे उरण सामाजिक संस्थेने पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्याकडे केली आहे.

